# कै.सौ.डा.
# आनंदीबाई जोशी यांचे चरित्र

लेखिका

**काशीबाई कानिटकर**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

कै.सौ.डा.आनंदीबाई जोशी यांचे चरित्र : काशीबाई कानिटकर

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com
मो.९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
शिल्पा कुलकर्णी

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ ३००/-

# प्रथमावृत्तीची प्रस्तावना

आमच्या देशास उर्जितावस्था येण्यास काय पाहिजे, असें जर कोणी विचारलें तर त्याला, ज्याच्या त्याच्या मताप्रमाणें जो तो निरनिराळीं उत्तरे देतो. कोणी म्हणतो स्त्रीशिक्षण अत्यावश्यक आहे; कांहींचें म्हणणें समाजरचनेंत बदल पाहिजे; पुष्कळांना राजकीय प्रकरणांत कमजास्त केलें पाहिजे असें वाटतें; कित्येक तर या सर्व गोष्टी सोडून धर्मांत उलथापालथ झाली पाहिजे असेंहीं म्हणतात. हे सर्व ठीकच आहे, परंतु यांत आणखी ज्या कांहीं मुख्य गोष्टी राहिल्या, त्या जर नसत्या तर आमच्या देशाला कधीं कालीं सुदीन येईल असें वाटत नाहीं. अशा या महत्त्वाच्या गोष्टी ती कोणत्या? असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. तरी या गोष्टी म्हणजे कर्तृत्व, धैर्य, साहस, आणि दृढनिश्चय इतके चार गुण. हे जर प्रत्येकाच्या अंगीं वसतील तर देशोन्नति होण्यास फारसा काल लागेल असें वाटत नाहीं.

अशा गुणांनीं मंडित अशीं पुष्कळ माणसें होऊन गेलीं. त्यांची कीर्ति अजरामर होऊन राहिली आहे. आज आपल्या डोळ्यांसमोर अशा प्रकारचीं हजारों उदाहरणें आहेत कीं, जीं कृत्यें नुसत्या निश्चयादि गुणांमुळेंच पार पडलीं! याला ताजें ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे ब्रह्मदेशची लढाई, इंग्लिशलोकांचें हिंदुस्थानांत चिरस्थायी झालेलें राज्य वगैरेंसारखीं पुष्कळ आहेत.

साधारण लोकांतही अशा प्रकारचे पुष्कळ लोक आढळतात. सौ. डा. आनंदीबाई जोशी, यांच्या अंगीं अशा प्रकारचे गुण वास करीत होते. निश्चय, साहस व धैर्य इत्यादि गुण त्यांच्या अंगीं वास करीत होते म्हणूनच त्यांनीं महत्कृत्य पार पाडलें! नाहीं तर त्यांचे हातून तें पार पडलें नसतें. त्यांच्या मनांत अमेरिकेंत जाऊन अमुक एक काम करावयाचें, असें आल्यापासून एकामागून एक अशीं

अनेक संकटें त्यांजवर आली; परंतु त्या निश्चयाच्या असल्यामुळें असल्या संकटांना मुळींच डगल्या नाहींत.

समाजाकडून अनेक प्रसंगीं अनेक अडचणी, अनेक संकटें व अनेक दुर्धर प्रसंग येत असतां, त्यांचा निश्चय एक तिळभरही न ढळतां उलट अधिकाधिक दृढ होत गेला! आपल्या भगिनीवर्गाची उन्नतावस्था व्हावी, म्हणून त्या त्यांच्या मार्गांत येणाऱ्या अडथळ्यांशीं सारखें झगडणें; मोठ्या शहाणपणानें, दूरदृष्टीनें जुन्या व नव्या मतांचा समेट करणें; जुन्या लोकांचीं मनें न दुखवितां नव्या उतावळ्या सुधारकांच्या मर्जा सांभाळणें; तसेंच, मूर्तिमंत ख्रिस्तीराज्यात तीन वर्षें राहून परधर्माचा स्वीकार न करणें; परदेशीयांचीं मनें न दुखवितां आपल्या आचाराचें संरक्षण करणें वगैरे गोष्टी आजपर्यंत पुरुषांकडूनही झाल्या नाहींत; परंतु आनंदीबाईंनी त्या करून दाखविल्या! आमच्या देशास काय पाहिजे? डॉ. सौ. आनंदीबाईंसारखी निश्चयी धीराचीं माणसें पाहिजेत, हेंच त्याचें उत्तर.

सौ. डॉ. आनंदीबाईंचें चरित्र लिहिण्यास त्यांच्या तोलाचेंच मनुष्य पाहिजे होतें, व ही इच्छा माझ्या एका विद्वान मैत्रीणीजवळ मीं एकें प्रसंगीं व्यक्त केली होती; परंतु कार्यबाहुल्यामुळें तिने नन्नाच्या पाढ्यासारखेंच उत्तर दिलें. झालें काम तर येथेंच होईल. अशी जी माझी आशा होती, ती निष्फळ झाल्यासारखी मला वाटली. कारण, त्या एका मैत्रिणीशिवाय पुस्तक लिहिण्यासारखी विद्वान स्त्री माझ्या ओळखीची व योग्य, अशीं दुसरी आढळण्यांस नाहीं. तेव्हा मला असा विचार पडला कीं, आतां कोणाला विचारावें! शेवटीं कोठेंच कांहीं जमेना, तेव्हा हे काम वेडेवाकडें आपणच करून टाकावें, असा मीं निश्चय केला.

इंग्लंडात व अमेरिकेंत प्रसिध्द स्त्रियांचीं चरित्रें विद्वान स्त्रियांकडून लिहिलीं जातात. त्याप्रमाणें आपल्या इकडेही आनंदीबाईंचें चरित्र त्यांच्याह्सारख्या स्त्रीकडून व्हावें, अशी फार इच्छा होती; परंतु ती वरील कारणानें पूर्ण झाली नाहीं. चरित्र लिहिण्यास पुरुषांपैकीं पुष्कळजण तयार होते. परंतु स्त्रीचें चरित्र स्त्रीकडून लिहिलें जावें, ही उत्कट इच्छा असल्यामुळें तोही मार्ग नाहींसा झाला, व हें असलेंच वेडेवाकडें चरित्र वाचण्याचें वाचकांच्या वांट्यास आलें. आता, झालें तें झालेंच; पण गोड करून घेणें हे मात्र वाचकांचें आहे. 'पदरीं पडलें आणि पवित्र झालें!' या न्यायानें त्यांनीं या पुस्तकास व मजसारख्या अनभ्यस्त लिहिणारणीसही आश्रय द्यावा. स्त्रीह्शिक्षणद्वेष्टे व दुराग्रही लोक या पुस्तकाकडे पाहून नाकें मुरडतील; परंतु अशा लोकांकरितां हें पुस्तक नाहीं आहे.

प्रथम हें काम करण्याचें रा.रा. वामनराव बाळकृष्ण रानडे, ज्ञानचक्षूचे एडिटर, यांनीं पत्करिलें व पत्रें वगैरेंची मिळवामिळव करून ठेवली. नंतर मी आपली इच्छा प्रदर्शित केल्यावरून, ती सर्व सामग्री त्यांनी माझ्या स्वाधीन केली. पुस्तक लिहिण्याची त्यांनीं आपली हौस एकीकडे ठेऊन, सामग्री मला दिली, याबद्दल मी त्यांची फारफार आभारी आहे. या सामग्रींत फक्त रा.रा. गोपाळरावांना अमेरिकेहून पाठविलेलीं आनंदीबाईंचीं कांहीं थोडी पत्रें, व श्रीरामपुराहून रा.रा. गंगाधर नृसिंह केतकर यांना गेलेलीं कामकाजासंबंधीचीं पत्रें, यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती. हें पाहून माझ्या मनांत आलें कीं, यांत सविस्तर चरित्र कसें लिहावयाला सांपडावें? शेवटीं एक युक्ति सुचली; अमेरिकेच्या मिसेस थिओडोशिया कार्पेंटर यांना पत्र पाठवावें, व कांहीं मिळाली तर अधिक माहिती मिळवावी. पुढें त्याप्रमाणें पत्र पाठविल्यावर, त्यांच्याकडून आणखी पुष्कळशीं हिंदुस्थानांतून गेलेली पत्रें व आनंदीबाई स्वत: न्यूयॉर्क येथें पोंचल्यापासून त्या हिंदुस्थानांत परत येण्यास निघाल्या त्या दिवसापर्यंतची सर्व हकीकत, त्यांनी त्यांच्या सवडीप्रमाणें लिहून कळविली. यासंबंधानें त्यांचे जितके आभार मानावे, तितके थोडेच आहेत.

जाहिरात प्रसिध्द होऊन एक वर्ष झालें, आणि पुस्तक आता प्रसिध्द होत आहे; तेव्हां कित्येक लोक म्हणतील की, छापायला इतका उशीर का? तर त्यांचे कारण असें कीं, एक तर ५०० वर्गणीदार मिळायला पाहिजे होते, ते लौकर मिळाले नाहींत. आणि दुसरें असें की, अमेरिकेच्या पत्रव्यवहाराला अतोनात वेळ लागतो. अगदी जरूरीचें पत्र जायचें तरी, सत्तावीस अठ्ठावीस दिवस लागतात! अशामुळे चरित्राची सामग्री मिळविण्यास अतिशय वेळ लागला. व रा. रा. गोपळराव जोशी यांनींही आपल्या सवडीप्रमाणे व आठवणी आठवणीनें बाईंच्या जन्मापासून थोडीथोडी हकीकत दिली. अशी ही चार ठिकाणची माहिती मिळविण्यास बराच उशीर लागला. व नंतर माझें सावकाश लिहिणें. मग काय विचारावें! अशा या अडचणीमुळें, ज्या कोणाची चरित्र वाचनाची उत्कट इच्छा असेल, त्यांना फार वेळ तिष्ठत बसावें लागलें; त्याला माझा नाइलाज आहे. या ठिकाणीं देशी छापखानेवाल्यांच्या दिरंगाईचा उल्लेख केल्यावांचून गत्यंतर नाहीं. या सर्व निव्वळ सबबी नसून खऱ्याच अडचणी आल्या; हे सांगितल्यावर त्यांचा राग कमी होईल, अशी माझी खातरी आहे.

पुस्तकांत कित्येक ठिकाणीं फार कडक लेख येऊन गेले आहेत; परंतु आनंदीबाईसारख्या स्त्रीचें चरित्र मला कळल्यावर जशी जशी माझ्या मनाची स्थिति

होत गेली, त्या मानानें कडक किंवा मृदु असा लेख येऊन गेला. यांत कोणाला साक्षात लागावा, असा माझा मुळींच हेतु नव्हता; परंतु तसें जर होत असेल, तर मी या ठिकाणीं, ज्यांची मनें नकळत दुखवलीं गेलीं असतील, त्यांची क्षमा मागतें.

माझ्या वाचनांत चरित्रें मुळीच आलीं नव्हती, यामुळें मला चरित्र लिहावें कसें, हें कळण्याला मार्ग नव्हता, लिहिण्याचें काम अंगावर घेऊनही बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें. शेवटी माझे परमप्रिय पति, रावसाहेब गोविंदराव वासुदेव कानिटकर यांनी 'इंग्रजींत अशी अशी लिहिण्याची पध्दत असते.' वगैरे माहिती सांगितली; व ठिकठिकाणीं मोठ्या महत्त्वाच्या सूचना केल्या; आणि काही पत्रांची भाषांतरे करून दिली; यांबद्दल मी फार फार आभारी आहे. खरोखर, असल्या दोन शब्दांत फिटणारे त्यांचे आभार नाहीत. कारण, आज पुस्तक लिहिण्याइतकी माझी योग्यता होण्यास तेच कारण आहेत. हे त्यांचे उपकार फिटण्यास, मीं सातजन्म आपल्या कातड्याचे जोडे करून त्यांच्या पायांत घातले, तरी ते फिटावयाचे नाहींत. आनंदीबाई विदुषी झाल्या, त्यांना आपल्या देशाचें हिताहित कळूं लागलें, या सर्वांचें श्रेय जसें गोपाळरावांकडे येतें; त्याचप्रमाणें मला पुस्तक लिहावेंसें वाटलें व तें लिहिण्याची स्वतंत्रता मिळाली, आणि शक्ति आली; या सर्वांचे श्रेय मजकडे नसून माझ्या परमपूज्य भ्रताराकडेच तें आहे. तेव्हां अशा त्यांच्या महदुपकाराची फेड या पुस्तकांत दोन शब्द लिहून होणार नाही. सबब या भानगडींत मी न पडावें हें बरें.

बंधु रा.रा. कृष्णराव विनायक वाबळे यांनी फार महत्त्वाची मदत केली. ती कोणती? तर आनंदीबाईंच्या पत्रांची भाषांतरे करणें. ती जर त्यांनी केली नसती, तर अडचण पडली असती. कारण इंग्रजीचीं भाषांतरें करण्याइतकी शक्ति मजमध्यें येण्यास मला आणखी कांहीं दिवस इंग्रजी शिकावें लागतें; नंतर चरित्र लिहिण्याचा विचार. परंतु ही अडचण, रा.रा. वागळे यांनी कृपा करून दूर केली; याबद्दल मी त्यांची फार फार आभारी आहे.

सज्जनांस विज्ञप्तिद्धमाझा हा पुस्तक लिहिण्याचा प्रथमच प्रयत्न असल्यामुळें यांत दोषस्थळें पुष्कळ असतील. तरी माझ्या विद्वान बंधूभगिनींनीं कृपा करून तीं मला कळविण्याची जर तसदी घेतली, तर मी त्यांची फार फार आभारी होईन. व सुदैवेकरून जर दुसऱ्या आवृत्तीची वेळ आलीच, तर ती दोषस्थळें सुधारण्याचा मी प्रयत्न करीन.

✦✦✦

## प्रकरण १

शालिवाहन शके १७८७ या वर्षीचा चैत्र शुध्द ९ (मार्च ३१, १८६५) हा दिवस, हिंदुस्थानच्या इतिहासांत नमूद करण्यासारखा होता. पुण्यांत काळेवावरांत पिंपळाजवळ बाळशास्त्री माटे यांच्या घरीं, मीं जो आजचा विषय लिहावयास हातीं धरला आहे, त्या विषयाची मुख्य नायिका, ह्या वरील दिवशीं जन्मली. आपल्या देशांत मुलगी झाली म्हणजे आईबापांना अत्यंत वाईट वाटतें. इतर कोणीं विचारलें कीं, अमक्या अमक्याला काय झालें हो?--'मुलगी!' असें उत्तर आल्यावर, तो प्रश्न करणारा उदासीनतेनें पुन: असे उद्गार काढितो. 'मुलगीच का?' पहा, मुलगी म्हणजे अतिशय नावडती वस्तु आहे. ती जगांत आल्यापासून कोणाला सुख होत नाहीं. तिला कोणी चांगल्या दृष्टीनें पहात देखील नाहीं! नेहमी 'मुलगीच ती! तिला कशाला अमुक अमुक' असें लोक म्हणत असतात. सगळ्यांची अशी समजूत असते कीं, 'मुलगी झाली असतां आईबापांला, मुलापासून जें सुख होतें, तें मुलीपासून होत नाहीं; मुलींच्यापायीं आईबाप फार खराबीला येतात; वगैरे गोष्टींमुळें मुलगी झाल्यापासून त्यांचे मन खट्टू असतें.' या सगळ्यांचें कारण आमच्यांतली विपरीत विवाहपध्दति होय. मुलगी उपवर झाली कीं, त्या आईबापांची साडेसाती आलीच म्हणून समजावें. जिथें जिथें वर असतील तिथें तिथें ते बिचारे जोडे फाडीत असतात. त्या मुलींस दुसऱ्याच्या गळ्यांत बांधतांना मोटांच्या मोटा पैसा द्यावा लागतो. त्यांच्यापुढे नाकदुऱ्या काढतां काढतां नाकाचे शेंडे झिजून जातात! इतकें करून मुलीला जेमतेम दुसऱ्याचे पदरीं एकदांची बांधली, म्हणजे त्यांना अंमळ डोकीवरचें ओझें खांद्यावर आलें, असें वाटतें. मुलगी सासरी चांगली वागली तर बरी, नाहीं तर, आईबापांना

वारंवार लेकीच्या घरीं पाणी भरावयाला जावें लागतें. एकादें क्षुल्लक काम ती चुकली कीं, आईबापांच्या शेंकडों पिढ्या उध्दरल्या जातात!! तेव्हां मुलगी झाल्याबरोबर होणाराला वाईट वाटावें यांत नवल तें काय? पण यांतल्या यांत चमत्कार हा वाटतो कीं, इतकी वाईट स्थिति लोक करून घेतात कां? 'मुलगी ही प्रत्येकाला आहेच, व प्रत्येक आपल्या मुलीचा बाप असतोच, मग तों आपली स्थिति आपल्या मुलीच्या लग्नांत किंवा तिच्या साऱ्या जन्मांत बदलीत कां नाहीं?' ज्यानें त्यानें असा विचार करावा कीं, मीं आपल्या मुलाच्या सासुसासऱ्याला वाईट वाटूं देणार नाहीं, अशी खबरदारी ठेवीन; पण जेव्हा मुलाचा बाप होण्याचा प्रसंग येतो, तेव्हां हा विचार त्याच्या मनांत मुळींच येत नाहीं. सगळ्यांनाच मुली आहेत, व सगळ्यांनाच खाली वाकण्याचा प्रसंग येतो, म्हणून सगळ्यांनी मिळून सर्वांच्या विचारें विवाहाच्या चालींत सुधारणा केली तर? पण तसें कोठून होणार?

अशा या कारणांमुळें प्रत्येक आईबापाला मुलगी झाली, म्हणजे वाईट वाटत असतें. त्याचप्रमाणें यमुनेच्या आईबापांना वाटलें. त्या बापड्यांना हें का ठाऊक होतें, कीं हें एक अलौकिक रत्न होईल म्हणून? यमुनाबाईंची आई ती बाळशास्त्री माट्यांच्या बहिणीची मुलगी होय. ह्या बाई आपल्या आजोळीं बाळंतपणास आल्या होत्या. रा.रा. गणपतराव अमृतेश्वर जोशी हे यमुनाबाईंचे वडील. गणपतराव यांच्या कोणत्याशा एका पूर्वजाला कल्याणजवळ कांहीं गांव इनाम मिळाले होते. जोश्यांच्या घरांत कोणी अंबाबाई या नांवाची बाई फार धार्मिक होती, तिच्या नांवावर अजून हें घर प्रसिध्द आहे. त्या इनामांपैकीं कांहीं गांव गणपतराव यांच्या वांट्यास आलें होंतें. हे गृहस्थ धर्मनिष्ठ, जुन्या चालींचें, शांत, सभ्य व मनमिळाऊ होते. यांना पहिल्या कुटुंबापासून एकच पुत्र होता. त्याचें नांव दामूराव. हे गृहस्थ अद्यापि कल्याण येथें रहात असून, त्यांनीं तेथें चांगला नांवलौकिक संपादिला आहे. हें कुटुंब वारल्यावर गणपतरावजींनीं द्वितीय संबंध केला. या बाईपासून गणपतरावजींस एक मुलगा व तीन कन्या अशी अपत्यें झालीं. त्या तीन मुलींपैकी यमुनाबाई ह्या मधल्या होत.

गणपतरावांचें कुटुंब प्रसूत होऊन बारा दिवस झाले. बाराव्या दिवशीं बाईंनीं मुलीचें नांव ''यमुना'' असें ठेविलें. यमुनाबाई तीन महिन्यांची झाली, तेव्हां तिची आई कल्याणास आपल्या घरीं गेली. गणपतरावांचें खासगी घर

कल्याणासच आहे. ते तेथेंच नेहमी रहात असत. त्याच ठिकाणीं यमूची आई बाळंतीण उठून गेली.

सृष्टिक्रमाप्रमाणें यमू दिवसमास वाढूं लागली. यमू लहान दोनतीन वर्षांची होती, तेव्हां फारच गोजीरवाणी दिसे. तिचा वर्ण साधारण गोरा होता. गाल लाल होते. केश काळेभोर असून कुरळे होते. आणखी, पोर मोठी खिलाडू आणि स्वच्छ होती. लहान मुलांच्या अंगी जितके मोहक गुण लागतात, तितके बहुत करून यमूंत होतेच. त्यामुळे ती सर्वांस आवडे. यमूला पांचवे वर्षी अतिशय देवी आल्या. त्या दुखण्यांतून यमुना नशिबानेंच वांचली, परंतु देवींमुळें यमुनेच्या आंगावर वण राहिले, व कानाला अपाय झाला. तसेंच, तिचें गोरेपण कमी होऊन काळेपणाची झांक मारू लागली. यमूच्या कानाला झालेल्या अपायाचें दुःख तिला पुढें जन्मभर भोगावें लागलें. यमू सहासात वर्षांची असतां, तिनें आपल्या शेजारच्या मुलीबाळी गोळा करून अक्षयीं खेळावें. एकदां असें झालें कीं, कल्याणास एक पाद्री जोशांच्या घराजवळ उपदेश करीत होता, हें यमुनेनें आपल्या दारांत उभें राहून पाहिलें. तेव्हांपासून यमुना आपल्या मैत्रिणी आल्या म्हणजे, त्यांना व्याख्यान देई. पाद्र्यानें व्याख्यान दिलें इतकेंच काय तें तिला कळे; बाकी, तो काय बोलला, हें समजून घेण्याची यमुनेमध्यें शक्ति नव्हतीच, पण त्यानें जे हावभाव करावे, ते सर्व तिनें लक्षांत ठेवावे, आणि तो बोलण्यांत स्वर कसे कसे बदली, हेंहि ती ध्यानांत धरी, व त्याप्रमाणें आपण कांहींतरी बोले. त्यानें केलेल्या अभिनयाप्रमाणें आणि काढलेल्या सुराप्रमाणें आपण त्याचें अनुकरण करी.

हे असें खेळ खेळूं लागली, म्हणजे तिची आई तिला म्हणे 'यमे तुला का पाद्रीण बनायचें आहे? त्या मेल्या पाद्रिणी लोकांच्या घरोघर जाऊन, लोकांना उपदेश करीत असतात, तसं तुला व्हावयाचं आहे वाटतं? चांगलं लेकूरपणासारखं खेळणं टाकलन, आणखी पोरी जमवून आपण पाद्रीण झाली आहे!' हे आईचें शब्द ऐकले म्हणजे, यमू, आपला तो उद्योग टाकून, दुसरें कांहीतरी खेळे. यमू भातुकलीचा खेळ क्वचित खेळे. ती बहुतकरून फुगड्या, झिम्मे, छप्पापाणी, झोंपाळ्यावर बसून ओंव्या म्हणणें, त्याचप्रमाणें घरें बांधणें, देव मांडून त्यांचा उत्सव करणें, असे खेळ खेळे. तसेंच, आपल्या परसांत ती बाग करी. त्या बागेंत बऱ्याचशा भाज्या, फुलांची झाडें वगैरे मोठ्या आवडीनें लावी. पण हीं झाडें फार दिवस न जगतां बहुतकरून गुरें तुडवीत किंवा खात. असें झालें म्हणजे यमुना

संतापे, रडे व गुराख्याला रागें भरे. आणि पुन्हां ती जमीन एकाद्या उलथण्यानें, नाहीं तर पळीच्या दांडग्यानें खणून, तींत मिळतील तीं झाडें लावी. कधीं कधीं तिनें बीं लावावें; आणखी एकदोन दिवसांनीं त्याला, खालीं मुळें फुटलीं आहेत कीं काय, म्हणून पहायला लागावें. 'गुरें झाडें खातात, तर तूं पुन्हां पुन्हां कशाला लावतेस? लावीत जाऊं नकोस.' असें यमूच्या आजीनें तिला दोनतीन वेळ म्हणून पाहिलें, पण यमूचा तो नाद आपला चालूच असे.

यमूच्या मैत्रिणी बहुतकरून दोन प्रहरानंतर दोन वाजण्याच्या सुमारास खेळण्यास येत. तोंपर्यंत यमू आपल्याशींच खेळे. तिच्या स्वभावाला एक पळभरसुध्दां रिकामें बसण्यास नको असे. दोन प्रहरीं घरांतील सर्व माणसें निजलीं म्हणजे, यमू आपल्या मैत्रिणी गोळा करी. आणखी तेव्हांपासून वर सांगितलेले खेळ खेळे. बहुतकरून बागेचाच खेळ ज्यास्त. बाग मोडल्याची कागाळी बहुतकरून एकदोन दिवसांनीं तात्यासाहेब (गणपतरावांना म्हणत) जोशी यांचे कानावर जाई. ती त्यांनीं ऐकिली म्हणजे ते म्हणत 'काय बेटी दीर्घोद्योगी आहे पहा! पुन: पुन: तेंच तें काम कितीदां करिते आहे, पण त्याचा तिला कंटाळा कसा येत नाहीं!'

यमूची आजी, तात्यासाहेबांच्या घरींच असे. तिचा यमूवर फार लोभ असे. यमूताईच्या मनांत कांहीं सांगावयाचें आलें, म्हणजे ती आपल्या आजीजवळ सांगे. आजीची यमू लाडकी होती. यमू खेळत असतां कधीं कधीं खोड्या करी, त्या तिच्या आईनें पाहिल्या म्हणजे, ती यमूला अतिशय मारी. यमूला मारतांना आजीनें पाहिलें म्हणजे, आजी यमूच्या आईला रागें भरे. आई मारूं लागली, म्हणजे फारच निर्दयतेनें मारी. त्यावेळीं तिचे अंत:करणांत ममतेचा लेशही नसे. मारतां मारतां यमू, कधीं कधीं डोळे पांढरेसुध्दां करी. एकदां यमूच्या आईला राग आला, आणि त्यावेळीं सर्पणांतलें एकादें खडबडीत लांकूड जरी तिच्या दृष्टीस पडलें, तरी त्या लांकडानें ती यमूस मारण्यास धांवे. हें आजीनें पाहिलें म्हणजे, आजी आपल्या लेकीला पुष्कळ बोले. ती म्हणे, 'ज्यांना पोरें आहेत, त्यांना अशा तऱ्हेचा आईपणा गाजविण्याची मोठी आवड; लोकांना कळलें पाहिजे कीं यांच्या पोरांना आईचा धाक आहे म्हणून? पोरगी मेली घामाघूम झाली पण अमळ मेले ते आपले हात आवरीत नाहीं. ते हात जळ्ळे कां नाहींत? पोरीच्या पाठीचीं सालडीं निघालीं किंगं!'